## राजू नायक : 'विद्या विकास मंडळ' स्थापनादिन सोहळ्यात मान्यवरांचा गौरव

# शिक्षण संस्थांनी सुजाण नागरिक घडवावेत

मडगाव, ता. २० (खास प्रतिनिधी) : सध्याच्या स्पर्धेच्या युगात सामाजिक मूल्ये ऱ्हास पावत असल्याने समाजात सुबत्ता वाढत असतानाच भ्रष्टाचारी वृत्तीही वाढू लागली आहे. या स्थितीतून समाजाला सावरायचे असेल तर चांगले सुजाण नागरिक तयार होण्याची गरज आहे. ही जबाबदारी आता शिक्षण संस्थांनी उचलण्याची गरज आहे. शिक्षण संस्थांनी फक्त विद्वान तयार करून भागणार नाही. त्यांनी हा समाज सुधारणारे चांगले नागरिक तयार करण्याची गरज आहे, असे मत 'गोमन्तक'चे संपादक संचालक राजू नायक यांनी व्यक्त केले.

मडगाव येथील विद्या विकास मंडळ या संस्थेच्या स्थापना दिन कार्यक्रमात नायक यांच्या हस्ते समाजात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केलेले माजी विद्यार्थी, गुणवंत आणि ज्येष्ठ शिक्षक आणि निवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

सत्कारमूर्तींच्या वतीने आलेक्स सिक्वेरा, शकुंतला भरणे, अजित दळवी, सरोजिनी सार्दिन, डॉ. सुधीर नरसापूर व आमंदा वाझ यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी ज्येष्ठ शिक्षक व निवृत्त कर्मचाऱ्यांचाही सत्कार करण्यात आला. यांच्यावतीने एवरीडा जॅकीस यांनी सत्काराला उत्तर दिले.






मडगाव : १) विद्या विकास मंडळातर्फे आलेक्स सिक्वेरा यांचा गौरव करताना गोमन्तकचे संपादक संचालक राजू नायक. सोबत नितीन कुंकळ्येकर, शीला गावणेकर व मधुकर मल्ल्या. २) संतोष देसाई यांचा सत्कार करताना गोमन्तकचे संपादक संचालक राजू नायक. (सोयरू कोमारपंत)



सत्कारमूर्ती : सरोजिनी सार्दिन



जितेंद्र अगरवाल



शकुंतला भरणे



अजित दळवी

> शिक्षण क्षेत्रात विद्या विकास मंडळ संस्थेने आतापर्यंत मोठी झेप घेतली असून या संस्थेचा उत्कर्ष आणखी चांगल्या प्रकारे व्हावा, असा आपला मानस आहे.
>
> -नितीन कुंकळ्येकर, अध्यक्ष, विद्या विकास मंडळ

यावेळी विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष नितीन कुंकळ्येकर, माजी अध्यक्ष शीला गावणेकर, रामनाथ कारे, गणेश दैवज्ञ, सचिव मधुकर मल्ल्या, मंडळाच्या संस्थापक सदस्यांपैकी असलेले नागेश बेणे, शाणू पाणंदीकर व अन्य मान्यवर उपस्थित होते.

यावेळी दामोदर वाणिज्य महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आलेक्स सिक्वेरा, शकुंतला भरणे, अजित दळवी, संतोष देसाई, जितेंद्र अगरवाल, कारे कायदा महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी सरोजिनी सार्दीन, विद्या विकास अकादमीचे माजी विद्यार्थी डॉ. सुधीर नरसापूर, डॉ. व्हेन मास्कारेन्हस, डॉ. ऑब्रेटा बार्रेटो, आमंदा वाझ आणि एरोन नोरोन्हा यांचा सत्कार करण्यात आला. स्वागत नितीन कुंकळ्येकर यांनी तर मधुकर मल्ल्या यांनी आभार मानले.